**Effective from: 30/09/2026**

# Privacy Policy

This Privacy Policy explains how Samvedana Analytics LLP ("Samvedana", "we", "us" or "our") collects, uses, stores, shares and protects personal data when you visit www.samvedanaanalytics.com (the "Website") or otherwise interact with us. Please read it together with our Terms of Use.

## 1. We handle personal data in dual capacity

It matters which of two roles we are in when we handle your data, because the law places different obligations on each:

- **Website data — we are the Data Fiduciary.** When you submit an enquiry, subscribe, or otherwise share personal data through this Website, Samvedana decides why and how that data is processed. Hence, for this data, we are the Data Fiduciary under the Digital Personal Data Protection Act, 2023 ("DPDPA"), and this Privacy Policy governs it in full.
- **Beneficiary and client data — we are the Data Processor.** When we conduct an impact assessment or provide MEL, reporting or advisory services, we handle beneficiary and programme data on behalf of, and on the documented instructions of, the client organisation. For that data the client organisation is the Data Fiduciary and Samvedana is the Data Processor. Our handling of that data is governed by our written agreement with the client, not by this Website policy. Read point no. 10 for more details.

## 2. Personal data we collect

### 2.1 Information you give us

When you use the enquiry or consultation form, or contact us by email, we collect the information you choose to provide, which typically includes:

- Full name;
- Organisation name;
- Email address;
- Phone number (optional);
- The purpose of your enquiry (selected from a menu); and
- Any message or details you include.

## 2.2 Information collected automatically

When you visit the Website, limited technical data may be collected automatically, such as your IP address, browser type, device information, pages visited and the date and time of your visit. Where this is collected through cookies or analytics tools, it is handled as described in point no. 8.

## 2.3 What we do not collect

We do not seek to collect any special or sensitive categories of information through this Website, and we ask that you do not submit them through the enquiry form. Do not send us, through this Website, any beneficiary personal data or any confidential personal data of third parties; the enquiry form is for your own business-contact details only.

# 3. The purposes for which we use your data

We use the personal data collected through this Website only for the following specified purposes:

| Purpose | What this means |
|---|---|
| Responding to your enquiry | To contact you, understand your requirement, and discuss whether and how we can help. |
| Providing information you request | To send resources, checklists or proposals you have asked for. |
| Service communication | To communicate with you about a consultation or engagement you have initiated. |
| Legal and record-keeping | To maintain records required for our own compliance and to establish, exercise or defend legal claims. |
| Improving the Website | To understand, in aggregate, how the Website is used and to improve it. This does not require identifying you individually. |

We will not use your personal data for any purpose that is incompatible with the purpose for which you provided it. If we ever need to use it for a new and unrelated purpose, we will seek your consent first.

## 4. The basis on which we process your data

Under the DPDPA, personal data may be processed for a lawful purpose for which you have given consent, or for certain legitimate uses recognised by the Act. For this Website:

- **Enquiry and consultation data** is processed on the basis of the consent you give when you submit the form, having been shown this Policy.
- **Where you approach us to request information or a service,** we may process the data you provide for that purpose as a legitimate use permitted by the Act.

You may withdraw your consent at any time, as described in Section 6. Withdrawing consent does not affect processing already carried out while your consent was in force.

## 5. How long we keep your data

We keep personal data only for as long as is necessary for the purpose it was collected for, and thereafter for any period required to comply with law or to protect our legal position. In practice:

- **Enquiries that do not lead to an engagement:** retained for up to 24 months from your last contact, then deleted or anonymised.
- **Enquiries that lead to an engagement:** retained for the duration of the engagement and for the period required by law and our record-keeping obligations thereafter.

When the retention period ends, we delete the personal data or irreversibly anonymise it so that it can no longer identify you.

## 6. Your rights

The DPDPA gives you rights over your personal data. Many of the Act's substantive provisions on data-principal rights come into force on 13 May 2027; we honour the following as our standing practice, and will give full statutory effect to them as they commence:

| Right | What you can do |
|---|---|
| Access | Ask us for a summary of the personal data we hold about you and how we are processing it. |
| Correction and completion | Ask us to correct inaccurate or misleading data, or complete incomplete data. |

| Right | What you can do |
|---|---|
| Erasure | Ask us to erase your personal data under Section 12 of the DPDPA, subject to any retention we are required to maintain by law. |
| Withdraw consent | Withdraw a consent you previously gave, as easily as you gave it. |
| Grievance redressal | Raise a grievance with us about how we handle your data, and receive a response. |
| Nominate | Nominate another individual to exercise your rights in the event of your death or incapacity, in the manner the law provides. |

To exercise any of these rights, write to **privacy@samvedanaanalytics.com**. We will respond within 30 days of receiving a verifiable request. We may need to confirm your identity before acting, to protect your data from unauthorised requests.

## 7. Grievance redressal

If you have any concern or complaint about how we handle your personal data, you may write to privacy@samvedanaanalytics.com. We aim to acknowledge within 7 days and resolve without undue delay.

If the Data Protection Board of India is constituted and operational and you are not satisfied with our response, you may have the right to approach it in the manner provided by the DPDPA and the rules made thereunder.

## 8. Cookies and analytics

The Website may use cookies and similar technologies. Strictly necessary cookies make the Website function and cannot be switched off. Any analytics or performance cookies, which help us understand Website usage, are used only where a lawful basis exists, and where consent is required we will seek it through a cookie notice before such cookies are set.

You can control cookies through your browser settings. Disabling some cookies may affect how parts of the Website work.

## 9. How we share personal data

We do not sell your personal data. We share it only in the limited circumstances below, and only to the extent necessary:

- **Service providers.** With trusted providers who help us operate the Website and our business — for example, form-hosting, email and IT providers — who are bound to process the data only on our instructions and to keep it secure.
- **Legal requirement.** Where we are required to disclose data by law, regulation, court order, or a lawful request from a public authority.
- **Protection of rights.** Where necessary to establish, exercise or defend legal claims, or to protect the rights, safety or property of Samvedana or affiliated other parties.
- **Business transfer.** In connection with any re-organisation, merger, or transfer of our business, subject to the recipient honouring this Policy.

Where any of our service providers is located outside India, any transfer is made in accordance with the requirements of applicable Indian law.

## 10. Beneficiary and client data — our role as Data Processor

A vital provision that distinguishes our work. When Samvedana is engaged to carry out an impact assessment or related services, we handle beneficiary and programme data that the client organisation collected. For that data:

- The client organisation is the Data Fiduciary and decides the purpose and means of processing;
- Samvedana is the Data Processor, and processes that data only for the purposes and by the means the client determines, under a written agreement;
- We apply appropriate security safeguards to that data — including access controls, encryption in transit and at rest where appropriate, and processing logs;
- Where a beneficiary wishes to exercise a right such as correction or erasure over their data, the request is made to the client organisation as Data Fiduciary, and we give effect to it on that organisation's instruction; and
- We retain that data only for the period the engagement and the client's legal obligations require, and then erase it.

The trust infrastructure we use to handle this data is **licensed from Axiomaera Private Limited**, a deep-tech, DPIIT-recognised company. Axiomaera acts solely as a licensor of that infrastructure; it does not receive, host, or process any beneficiary data. This Privacy Policy does not govern beneficiary data — that data is governed by our agreement with the relevant client organisation.

## 11. How we protect your data

We maintain reasonable security safeguards designed to protect personal data against unauthorised access, alteration, disclosure or destruction, appropriate to the nature of the data and the harm that might result from a breach. These include access controls, secure hosting, and limiting access to those who need it. No method of transmission or storage is completely secure, and while we work to protect your data we cannot guarantee absolute security.

## 12. Children

This Website and its enquiry form are intended for professional and organisational contact by adults. We do not knowingly collect personal data of children through this Website. If you believe a child has provided personal data through the Website, please contact us at privacy@samvedanaanalytics.com and we will take appropriate steps to delete it.

## 13. Links to other websites

The Website may link to third-party websites and official resources (for example, government or regulator pages). We are not responsible for the privacy practices or content of those websites. This Policy applies only to Samvedana's Website.

## 14. Changes to this Policy

We may update this Policy from time to time to reflect changes in law, our practices, or the Website. The current version, with its effective date, will always be available on this page. Where a change is material, we will take reasonable steps to bring it to your attention. Your continued use of the Website after a change takes effect means you have read the updated Policy.

## 15. Contact us

For any question about this Policy or your personal data:

| | |
|---|---|
| **Data protection** | privacy@samvedanaanalytics.com |
| **General contact** | contact@samvedanaanalytics.com · +91-9892727808 |
| **Office hours** | 10.00 a.m. to 6.00 p.m. |

*— End —*

**अंमलबजावणीची तारीख : 30/9/2026**

# गोपनीयता धोरण

हे गोपनीयता धोरण संवेदना अनॅलिटिक्स एलएलपी ("संवेदना", "आम्ही", "आम्हाला" किंवा "आमचे") कशा प्रकारे वैयक्तिक माहिती गोळा करते, वापरते, साठवते, सामायिक आणि संरक्षित करते त्याबद्दल आहे. तुम्ही जेव्हा www.samvedanaanalytics.com ("संकेतस्थळ") किंवा अन्य मार्गाने आमच्याशी संवाद साधता तेव्हा हे धोरण लागू होते.

## 1. माहितीची हाताळणी दुहेरी भूमिकेतून होते

तुमची माहिती हाताळताना आम्ही कोणत्या भूमिकेत आहोत ते महत्त्वाचे आहे कारण कायद्यानुसार प्रत्येक भूमिकेची वेगळी दायित्वे आहेत.

- **संकेतस्थळावरील माहितीसाठी – आम्ही डेटा फिड्युशरी आहोत.** जेव्हा तुम्ही चौकशीसाठी, सदस्यत्वासाठी किंवा अन्य कोणत्या कारणासाठी या संकेतस्थळाद्वारे वैयक्तिक माहिती सामायिक करता, तेव्हा दिलेली माहिती कोणत्या कारणासाठी व कशी वापरायची हा निर्णय संवेदना घेते. म्हणूनच या माहिती संदर्भात डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा, 2023 अन्वये संवेदना ही डेटा फिड्युशरी आहे.
- **लाभार्थी आणि ग्राहकांची माहिती – आम्ही डेटा प्रोसेसर आहोत.** जेव्हा आम्ही प्रभाव मूल्यांकन, MEL, अहवाल सादरीकरण किंवा सल्लागार सेवा प्रदान करतो तेव्हा लाभार्थी आणि प्रकल्पा संदर्भातील माहिती, ग्राहक संस्थेच्या वतीने आणि त्यांच्या नोंदवलेल्या सूचनांनुसार, हातळतो. या माहिती संदर्भात ग्राहक संस्था ही डेटा फिड्युशरी आहे तसेच संवेदना ही डेटा प्रोसेसर आहे. या माहितीची हाताळणी ग्राहकांशी झालेल्या लिखित करारानुसार केली जाते, या संकेतस्थळाच्या धोरणानुसार नाही. विस्तृत माहितीसाठी मुद्दा क्रमांक 10 वाचा.

## 2. आम्ही गोळा केलेल्या वैयक्तिक माहिती संदर्भात

### 2.1 तुम्ही आम्हाला दिलेली माहिती

चौकशीसाठी किंवा सल्ल्यासाठी किंवा ईमेलद्वारे आम्हाला संपर्क करण्यासाठी तुम्ही जी माहिती देता ती आम्ही वापरतो. जसे की:

- संपूर्ण नाव
- संस्थेचे नाव
- ईमेल
- फोन नंबर (ऐच्छिक)
- चौकशीचे कारण (दिलेल्या पर्यायांपैकी); आणि
- अन्य संदेश किंवा तुम्ही दिलेले तपशील

### 2.2 स्वयंचलितपणे गोळा केलेली माहिती

तुम्ही संकेतस्थळाला भेट दिल्यावर ठराविक तांत्रिक माहिती आपोआप गोळा केली जाते, जसे की तुमचा आयपी ॲड्रेस, ब्राउझरचा प्रकार, डिव्हाइसची माहिती, भेट दिलेल्या पृष्ठांची माहिती आणि तुमच्या भेटीची तारीख व वेळ. ही माहिती कूकीस किंवा विश्लेषणाच्या साधानांद्वारे गोळा केल्यावर कशी हाताळली जाते ते मुद्दा क्रमांक ८ मध्ये विस्तृतपणे सांगितले आहे.

### 2.3 आम्ही कोणती माहिती गोळा करत नाही

आम्ही या संकेतस्थळाद्वारे कोणतीही विशेष किंवा संवेदनशील माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करत नाही. आमची विनंती आहे की तुम्ही अशा प्रकारची माहिती चौकशी अर्जासोबत पाठवू नये. या संकेतस्थळाद्वारे आम्हाला लाभार्थींची वैयक्तिक माहिती किंवा तृतीय पक्षांची गोपनीय वैयक्तिक माहिती पाठवू नका. चौकशी अर्ज केवळ तुमच्या स्वत:च्या व्यावसायिक संपर्क तपशीलांसाठी आहे.

## 1. तुमची माहिती (डेटा) वापरण्याची उद्दिष्टे

खालील बाबींसाठी या संकेतस्थळाद्वारे तुमची वैयक्तिक माहिती वापरली जाते.

| उद्दिष्टे | याचा अर्थ काय होतो |
|---|---|
| तुमच्या चौकशील प्रतिसाद देणे | तुम्हाला संपर्क करण्यासाठी, तुमची गरज जाणून घेण्यासाठी आणि तुम्हाला मदत करू शकतो का आणि कशी याबाबत तुमच्याशी चर्चा करण्यासाठी. |
| तुम्ही विचारलेली माहिती पुरवणे | तुम्ही मागविलेली साधने, तपासणी याद्या (चेकलिस्ट) किंवा प्रस्ताव पाठवण्यासाठी |
| सेवांविषयी संवाद | तुमच्या पुढाकाराने सुरू झालेल्या सल्लामसलतीबाबत किंवा सहभागाबाबत तुमच्याशी संवाद साधण्यासाठी |
| कायदा पालन आणि अभिलेख जतन | आमच्या स्वत:च्या अनुपालनासाठी आवश्यक असलेले अभिलेख जतन करण्यासाठी आणि कायदेशीर दावे प्रस्थापित करण्यासाठी, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा त्यांचा बचाव करण्यासाठी. |
| संकेतस्थळ सुधारणे | एकूणच संकेतस्थळाचा वापर कसा केला जातो ते समजून घेण्यासाठी आणि संकेतस्थळ सुधारण्यासाठी. यासाठी तुमची वैयक्तिक ओळख पटवणे गरजेचे नाही. |

आम्ही तुमच्या वैयक्तिक माहितीचा वापर तुम्ही नमूद केलेल्या उद्देशाखेरीज अन्य कोणत्याही दुसऱ्या उद्देशासाठी करणार नाही. नवीन किंवा संदर्भाव्यतिरिक्त उद्देशांसाठी आम्हाला या माहितीची गरज पडल्यास, ती वापरण्यासाठी प्रथम तुमची परवानगी घेतली जाईल.

## 2. तुमच्या माहितीवर प्रक्रिया करण्याचा मुख्य आधार

DPDPA अनुसार, तुम्ही संमती दिलेल्या कायदेशीर उद्देशासाठी किंवा या अधिनियमात नमूद केलेल्या कायदेशीर वापरांसाठी वैयक्तिक माहितीवर प्रक्रिया केली जावू शकते. या संकेतस्थळासाठी:

- **चौकशी आणि सल्लागारसेवेद्वारे मिळालेली माहिती** – चौकशी अर्ज सादर करताना, हे धोरण वाचल्यावर तुम्ही दिलेल्या संमतीच्या आधारे त्या माहितीवर प्रक्रिया केली जाते
- **माहिती किंवा सेवांसाठी आम्हाला संपर्क केल्यावर** – तुम्ही आम्हाला सादर केलेल्या माहितीवर केवळ त्याच उद्देशासाठी प्रक्रिया केली जाते जी कायद्याने ग्राह्य वापरासाठी असेल

## 3. किती काळ तुमची माहिती राखून ठेवली जाते

तुमची वैयक्तिक माहिती ज्या उद्देशासाठी आम्ही गोळा केली होती, त्या उद्देशासाठी आवश्यक असेल तितक्याच कालावधीसाठी राखून ठेवली जाते. त्यानंतर कायद्याच्या अनुपालनासाठी किंवा आमची कायदेशीर स्थिती सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या कालावधीपर्यंत ती जपून ठेवली जाते. प्रत्यक्षात –

- **चौकश्या, ज्या सहभागात रूपांतरित होत नाहीत** – तुम्ही अर्ज केल्यापासून पुढील 24 महिन्यांपर्यंत माहिती राखून ठेवली जाते. त्यानंतर ती खोडून टाकली जाते किंवा तिचे अनामिकीकरण केले जाते
- **चौकश्या, ज्या सहभागात रूपांतरित होतात** – करार किंवा कामाच्या कालावधीसाठी, तसेच त्यानंतर कायद्यानुसार आणि आमच्या अभिलेख जतन करण्याच्या दायित्वांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेल्या कालावधीपर्यंत ही माहिती राखून ठेवली जाते.

माहिती धारणेचा कालावधी संपल्यावर आम्ही वैयक्तिक माहिती खोडून टाकतो किंवा तिचे अपरिवर्तनीयपणे अनामिकीकरण करतो जेणे करून तुमची ओळख पटणार नाही.

## 4. तुमचे अधिकार

DPDP कायदा तुम्हाला तुमच्या वैयक्तिक माहितीवर अधिकार देतो. या कायद्यातील 'डेटा प्रिन्सिपल'च्या अधिकारांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या तरतुदी 13 मे 2027 पासून अंमलात येणार आहेत. आम्ही खालील बाबींचा आमच्या नियमित कार्यपद्धतीचा भाग म्हणून आदर करतो आणि त्या अंमलात येताच त्यांना पूर्ण कायदेशीर स्वरूप देऊ.

| अधिकार | तुम्ही काय करू शकता |
|---|---|
| प्रवेश (Access) | तुमच्याबद्दल आमच्याकडे असलेल्या वैयक्तिक माहितीचा सारांश आणि त्यावर आम्ही कशा प्रकारे प्रक्रिया करत आहोत, याची माहिती आमच्याकडे मागणे. |
| सुधारणा आणि पूर्णता | चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती दुरुस्त करण्यासाठी किंवा अपूर्ण माहिती पूर्ण करण्यासाठी आम्हाला संपर्क करणे. |

| अधिकार | तुम्ही काय करू शकता |
|---|---|
| इरेजर (कायमस्वरूपी माहिती खोडून टाकणे) | DPDP कायद्याच्या कलम 12 अन्वये तुमची वैयक्तिक माहिती खोडून टाकण्यासाठी आम्हाला सांगणे, कायद्यानुसार आम्हाला राखून ठेवाव्या लागणाऱ्या कोणत्याही बाबींच्या अधीन राहून. |
| संमती मागे घेणे | आधी ज्या पद्धतीने संमती दिली होती तितक्याच सहजतेने ती मागे घेणे. |
| तक्रार निवारण | आम्ही तुमची माहिती कशी हातळतो त्याबाबत तक्रार करणे आणि त्यावर प्रतिसाद मिळवणे. |
| नामनिर्देशित करणे | तुमच्या मृत्यूनंतर किंवा असमर्थतेच्या स्थितीत, कायद्याने विहित केलेल्या पद्धतीनुसार तुमचे अधिकार बजावत दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला नामनिर्देशित करणे |

यापैकी कोणतेही अधिकार बजावण्यासाठी, **privacy@samvedanaanalytics.com** इथे संपर्क करा. पडताळणीयोग्य विनंती प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत आम्ही प्रतिसाद देऊ.

## 5. तक्रार निवारण

आम्ही तुमची वैयक्तिक माहिती कशी हातळतो याबाबत तुम्हाला शंका किंवा तक्रार असल्यास **privacy@samvedanaanalytics.com** इथे संपर्क करा. आम्ही 7 दिवसांच्या आत पोचपावती देण्याचे आणि विनाकारण विलंब न करता प्रकरण निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

जर 'डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडिया'ची स्थापना होऊन ते कार्यरत झाले असेल आणि तुम्ही आमच्या प्रतिसादाबाबत समाधानी नसाल, तर DPDP कायद्यातील नियमांमध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार त्या बोर्डाकडे दाद मागण्याचा अधिकार तुम्हाला असू शकतो.

## 6. कुकीज आणि विश्लेषण

हे संकेतस्थळ कुकीज आणि तत्सम तंत्रज्ञानाचा वापर करू शकते. अत्यंत आवश्यक असलेल्या कुकीज संकेतस्थळ कार्यरत ठेवण्यासाठी अनिवार्य आहेत, त्या बंद करता येणार नाहीत. संकेतस्थळाच्या वापराबाबत माहिती देणाऱ्या अनॅलिटिक्स किंवा परफॉर्मेंस कुकीजचा वापर केवळ कायदेशीर आधार असल्यास केला जाईल. तसेच जिथे संमती आवश्यक असेल, तिथे अशा कुकीज कार्यान्वित करण्यापूर्वी आम्ही 'कुकी नोटिस' द्वारे तुमची संमती घेऊ.

तुम्ही तुमच्या ब्राऊझर सेटिंग्जद्वारे कुकीजवर नियंत्रण ठेवू शकता. काही कुकीज बंद केल्यास संकेतस्थळाच्या काही भागांच्या कार्यपद्धतीवर परिणाम होऊ शकतो.

## 7. वैयक्तिक माहिती आम्ही कशी सामायिक करतो

आम्ही तुमची वैयक्तिक माहिती विकत नाही. खालील नमूद मर्यादित परिस्थितीत आणि केवळ आवश्यक त्या मर्यादेपर्यंतच ती सामायिक करतो :

- **सेवा पुरवठादार (सर्विस प्रोव्हायडर)** – आमचे संकेतस्थळ आणि व्यवसाय चालवण्यास मदत करणाऱ्या विश्वसनीय पुरवठादारांसोबत – उदाहरणार्थ, फॉर्म-होस्टिंग, ईमेल, आणि आयटी सेवा पुरवठादार – जे केवळ आमच्या सुचनांनुसारच माहितीवर प्रक्रिया करण्यास आणि ती सुरक्षित ठेवण्यास बांधील आहेत.
- **कायदेशीर गरज** – जेथे आम्हाला कायदा, नियमन, न्यायालयाचा आदेश किंवा सार्वजनिक प्राधिकरणाच्या कायदेशीर विनंतीनुसार माहिती उघड करणे आवश्यक असेल.
- **अधिकारांचे संरक्षण** – जिथे आवश्यक असेल तिथे कायदेशीर दावे प्रस्थापित करण्यासाठी, त्यांच्या अंमलबजावणीसाठी किंवा त्यांच्या बचावासाठी अथवा संवेदना किंवा संबंधित इतर पक्षांचे हक्क, सुरक्षितता किंवा मालमत्ता यांचे रक्षण करण्यासाठी.
- **व्यवसायाचे हस्तांतरण** – आमच्या व्यवसायाची पुनर्रचना, विलीनीकरण किंवा हस्तांतरण यांसंदर्भात; मात्र यासाठी संबंधित प्राप्तकर्त्यांने या धोरणाचे पालन करणे आवश्यक असेल.

जेव्हा आमचा एखादा सेवा पुरवठादार भारताबाहेर स्थित असेल, तेव्हा कोणतीही हस्तांतरण प्रक्रिया लागू असलेल्या भारतीय कायद्यानुसार अवश्यकतांनुसार केली जाईल.

## 8. लाभार्थी आणि ग्राहक माहिती – आम्ही डेटा प्रोसेसरच्या भूमिकेत

आमच्या कार्यातला वेगळेपणा या महत्त्वपूर्ण तरतुदीत आहे. जेव्हा संवेदनाकडे प्रभाव मूल्यांकन किंवा तत्सम सेवांचे काम सोपविले जाते, तेव्हा आम्ही ग्राहक संस्थेने संकलित केलेली लाभार्थी आणि कार्यक्रमाविषयीची माहिती हाताळतो. त्या माहितीच्या संदर्भात :

- ग्राहक संस्था ही डेटा फिड्युशरी आहे आणि माहिती प्रक्रियेचा उद्देश आणि साधने निश्चित करते
- संवेदना ही डेटा प्रोसेसर आहे आणि ग्राहकाने लेखी करारानुसार निश्चित केलेल्या उद्देशांसाठी आणि पद्धतीने माहितीवर प्रक्रिया करते
- आम्ही सुयोग्य सुरक्षा उपाययोजना लागू करतो – ज्यामध्ये ॲक्सेस कंट्रोल्स (प्रवेश नियंत्रण), योग्य तिथे डेटा वाहन (transit) आणि साठवणुकीदरम्यान (at rest) एन्क्रिप्शन, तसेच प्रोसेसिंग लॉग्ज यांचा समावेश असेल.
- जेव्हा एखाद्या लाभार्थ्याला स्वतःच्या माहितीबाबत दुरुस्ती किंवा इरेजर (खोडून टाकणे) यांसारख्या अधिकारांचा वापर करायचा असेल तेव्हा ती विनंती डेटा फिड्युशरी असलेल्या संबंधित ग्राहक संस्थेकडे केली जाते आणि आम्ही त्या संस्थेच्या सुचनेनुसार त्यावर अंमलबजावणी करतो.
- आम्ही ती माहिती केवळ सेवा करार आणि ग्राहकाच्या कायदेशीर जबाबदऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या कालावधीपुरतीच जतन करतो आणि त्यानंतर ती नष्ट करतो.

आमची माहिती हाताळण्यासाठीची विश्वास-पायाभूत प्रणाली Axiomaera Private Limited ह्या डीप-टेक DPIIT-मान्यताप्राप्त कंपनीने विकसित केलेली आहे. Axiomaera केवळ या प्रणालीचा परवानादाता आहे; ते कोणतीही लाभार्थींची माहिती प्राप्त करत नाहीत, साठवत नाहीत किंवा त्यावर प्रक्रिया करत नाहीत. हे गोपनीयता धोरण लाभार्थींच्या माहितीला लागू होत नाही — ती माहिती संबंधित ग्राहक संस्थेशी झालेल्या आमच्या कराराद्वारा नियंत्रित केली जाते.

## 9. आम्ही तुमच्या माहितीचे संरक्षण कसे करतो

आम्ही वैयक्तिक माहितीचे अनधिकृत प्रवेश, बदल, प्रकटीकरण किंवा नष्ट करणे यांपासून संरक्षण करण्यासाठी, माहितीचे स्वरूप आणि उल्लंघनामुळे होणाऱ्या संभाव्य हानीला अनुरूप अशा वाजवी सुरक्षा उपाययोजना राखतो. यामध्ये प्रवेश नियंत्रण, सुरक्षित होस्टिंग आणि ज्यांना गरज आहे त्यांच्यापुरता प्रवेश मर्यादित करणे यांचा समावेश आहे. माहितीचे वहन किंवा साठवणूक करण्याची कोणतीही पद्धत पूर्णपणे सुरक्षित नसते; त्यामुळे, आम्ही तुमची माहिती सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करत असलो तरी, आम्ही पूर्ण सुरक्षिततेची हमी देऊ शकत नाही.

## 10. मुलांसंदर्भात

हे संकेतस्थळ आणि त्यावरील चौकशी अर्ज व्यावसायिक आणि संस्थात्मक संपर्कासाठी प्रौढांनी वापरावा. आम्ही या संकेतस्थळाद्वारे मुलांची वैयक्तिक माहिती जाणूनबुजून गोळा करत नाही. जर तुम्हाला असे वाटते की एखाद्या मुलाने या संकेतस्थळाद्वारे वैयक्तिक माहिती दिली आहे, तर कृपया privacy@samvedanaanalytics.com यावर आमच्याशी संपर्क साधा. आम्ही ती माहिती काढून टाकण्यासाठी योग्य ती पावले उचलू.

## 11. इतर संकेतस्थळांचे दुवे (लिंक्स)

हे संकेतस्थळ तृतीय-पक्षीय संकेतस्थळे आणि अधिकृत संसाधनांचे (उदाहरणार्थ सरकारी किंवा नियामक संस्थांची पृष्ठे) दुवे (लिंक्स) देऊ शकते. त्या संकेतस्थळांच्या गोपनीयतेच्या पद्धतींबद्दल किंवा त्यावरील मजकूरासाठी आम्ही जबाबदार नाही. हे धोरण केवळ संवेदनाच्या संकेतस्थळाला लागू होते.

## 12. या धोरणातील बदल

कायद्यातील बदल, आमच्या कार्यपद्धती किंवा संकेतस्थळामधील बदल दर्शविण्यासाठी आम्ही वेळोवेळी या धोरणात सुधारणा करू शकतो. या धोरणाची अद्ययावत आवृत्ती आणि ती लागू होण्याची तारीख या संकेत पृष्ठावर नेहमी उपलब्ध असेल. जर बदल महत्त्वपूर्ण असतील, तर ते तुमच्या निदर्शनास आणण्यासाठी आम्ही योग्य ती पावले उचलू. बदल लागू झाल्यानंतरही तुम्ही संकेतस्थळाचा वापर सुरू ठेवल्यास, तुम्ही अद्ययावत धोरण वाचले आहे असा त्याचा अर्थ होईल.

## 13. संपर्क

या धोरणाबाबत किंवा तुमच्या वैयक्तिक माहितीसंदर्भात कोणतेही प्रश्न असल्यास खालील ईमेलवर संपर्क करा.

| | |
|---|---|
| **माहिती संरक्षण विषयी** | privacy@samvedanaanalytics.com |
| **सामान्य कारणांसाठी** | contact@samvedanaanalytics.com · +91-9892727808 |
| **कार्यालयीन वेळ** | सकाळी 10.00 ते सायं. 6.00 |

*– समाप्त –*